PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jotibacha Navas
Year: 1975

Song: Hi Duniya Hay Ek Jatra
Lyricist: Jagdish Khebudkar

ओ...
हो... ओ...
हो... ओ...
हो...

ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा
हया दुनियेला झुकवत नाही
त्यो एक येडा भित्रा
त्यो एक येडा भित्रा
हो...
त्यो एक येडा भित्रा
अरं भिऊ नको हे मागं पाहू नको
अरं भिऊ नको हे मागं पाहू नको
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

नशीबाचा फिरतो पाळणा
ही अवघड फेरी
कुणी धरली हातामदी
समजंना दोरी
नशीबाचा फिरतो पाळणा
ही अवघड फेरी
कुणी धरली हातामदी
समजंना दोरी
घेरी येऊन वरडन त्याला
जलमाचा बसतोय हादरा
जलमाचा बसतोय हादरा
ओ...
जलमाचा बसतोय हादरा
असं करू नको
हो असं करू नको
हे असं करू नको
हो असं करू नको
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

गरीबीचा सिनेमा बघा
सोडूनी लाज
सुखा संग दुःखाची
ऐका वाजतीया झांज
गरीबीचा सिनेमा बघा
सोडूनी लाज
सुखा संग दुःखाची
ऐका वाजतीया झांज
येडी आशा बाहूली होऊन
उगाच दावतीया नखरा
उगाच दावतीया नखरा
हो... ओ...
उगाच दावतीया नखरा
असं वागू नको
हे मागं लागू नको
असं वागू नको
हे मागं लागू नको
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.

हयो फिरता घोडा
नाव त्याचं व्यवहार
कुणी चोर असेल तो
टांग टाकून स्वार
हयो फिरता घोडा
नाव त्याचं व्यवहार
कुणी चोर असेल तो
टांग टाकून स्वार
हितंच हाय पर दिसत नाय
पोलीस मारतोय चक्करा
पोलीस मारतोय चक्करा
हो... ओ...
पोलीस मारतोय चक्करा
हं नको जाळं इंणू

---

तुला काय म्हणू
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

हे माणूसकीचं हाटेल बघतंय वाट
कुणी तिखाट भेटतो
इथं कुणी गुळमाट
हे माणूसकीचं हाटेल बघतंय वाट
कुणी तिखाट भेटतो
इथं कुणी गुळमाट
तुकडयासाठी लाचार होऊन
शेपूट हालवी कुत्रा
शेपूट हालवी कुत्रा
शेपूट हालवी कुत्रा
लयं भुकू नको
हो डोळे झाकू नको
लयं भुकू नको
हो डोळे झाकू नको
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

हया गर्दीमंदी इसर पडतो देवाचा
तोंडानं चालतो गजर नुसत्या नावाचा
हया गर्दीमंदी इसर पडतो देवाचा
तोंडानं चालतो गजर नुसत्या नावाचा
काळया पैशाची चांदी घेऊन
देवळाला मारत्यात पत्रा
देवळाला मारत्यात पत्रा
ओ...
देवळाला मारत्यात पत्रा
कुणी काय म्हणां
हो कुणी काय म्हणां
हो कुणी काय म्हणां
हो कुणी काय म्हणां
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा
ही दुनिया हाय एक जत्रा
हवसं गवसं नवसं सतरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*